भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६९७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/१०/२०१७

**१) प्राणी निर्दयतेने कोंबुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०७/१०/२०१७ चे २०.०० ते २०.३० वाजता दरम्यान यातील आरोपी हा त्याचे ताब्यातील ट्रक क्र. एम एच ३५ के ३९४४ मध्ये २३ बैल कि. १,०००,००/रु चे जनावरे डांबुन, कोंबुन त्यांना निर्दयतेने वागणुक देत त्याच्या चाऱ्या पाण्याची व्यवस्था सोबत न बाळगता, विनापरवाना वाहतुक करतांनी मिळुन आल्याने ,फिर्यादी योगेश रमेश शेंडे वय ३६ वर्ष रा. गडेगाव शेती गौरक्षण संस्था अध्यक्ष गडेगाव यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ११,(१)(ड)(ई) प्राणी. निर्दयतेने वागविण्याचा कायदा. सहकलम ५ (अ)(१) प्राणी. सं. कायदा सहकलम ६६/१९२ मोवाका. भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पोहवा. मनघटे पो.स्टे कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०८/१०/२०१७ चे ०.८.०० वाजता दरम्यान यातील आरोपीचे घरी फिर्यादीचा पती दारू पिण्यास गेला असता फिर्यादी ही आरोपीचे घरासमोरील रोडवर जावुन आरोपीचे घरासमोरील रोडवर जावुन आरोपीस दारू कशाला विकता, तुझ्या गावाचे लोक बिघडतात, असे म्हटले असता आरोपीने फिर्यादीला तु बोलणारी कोण आहेस? म्हणुन रोडवर येवुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करून धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चांदेवार पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

**३) संगनमत करून सरकारी कामात अडथडा आणुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करून, विनयभंग करून बस पेटविण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०३/१०/२०१७ चे १६.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही एसी बस. क्र. एमएच. ०७ सी. ९३५३ वर वाहक म्हणुन नौकरी करीत असतांना, यातील आरोपी क्र. (प्रवासी) याचे चिल्लर ३/ रू परत करण्याचे कारणा वरून आरोपींनी संगनतम करून फिर्यादी ही आपले सरकारी काम करीत असतांना तिला अश्लिल शब्दात शिवीगाळ करून तीचे हात पकडुन तिचे परीधान केलेले सरकारी ड्रेसची ओढतांन करून विनयभंग करून बस पेटविण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,,३५४,३५३,१८६,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. रेवतकर पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

**३) संगनमत करून विटाने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०७/१०/२०१७ चे १९.३० वाजता दरम्यान फिर्यादी विश्वनाथ रामा मरकाम वय ६९ वर्ष रा. जाब हा बाजारातुन भाजीपाला घेवुन घरी येत असता त्याला भुक लागल्याने भेल च्या दुकानात भेल खात असतांना यातील आरोपी क्र. ०१ हा त्यावेळी त्याच ठिकाणी येवुन तु माझ्यावर जादु टोना केलास, असे बोलुन शिवीगाळ केली, तेव्हा घरी जावुन पत्नीला सांगितले असता, ती त्यास हटकण्या करीता, आरोपीचे घरी फिर्यादी सह गेली तेव्हा संगनमत करून आरोपी क्र. ०१ ने फिर्यादीचे दोन्ही हात पकडुन आरोपी क्र. ०२ ने त्याचे घरा समोर ठेवलेली मातीची विट फेकुन मारली असता, ति विट फिर्यादीचे डोक्यावर लागुन जखमी झाला. व शिवीगाळ करून पुढे मारण्या पीटण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३२४,५०६,५०४, ३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. सपाटे पो.स्टे आंधळगाव करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) संगनमत करून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद –**

दिनांक ०४/१०/२०१७ चे ०९.०० ते ९.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीही स्वतःचे घरी हजर असतांनी यातिल आरोपी ग्रामपंचायत चिचाळचे सरपंच व ईतर सहा आरोपीतांनी अतिक्रमण हटविने करीता संगनमत करून फिर्यादीचे घरा मागिल खुल्या जागेतील सिमेटचे खांब उपळु नका म्हटल्यावर आरोपींनी फिर्यादीला बाजुला ढकलुन दिले व आरोपी क्र. २ ने अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व तुला कोणी वानवीत नाही, असे बोलुन मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम १४३,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कढाणे पो.स्टे दिघोरी हे करीत आहेत.

**६) इलेक्ट्रीक मोटार,केबल वयार व नॉयलान रस्सा ची चोरी . –**

दिनांक ०७/१०/२०१७ ते ०८/१०/२०१७ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी नवीन घराचे बांधकामाचे बोरवेल मध्ये लावलेली टेक्समो कंपनीची ०१ एचपीची सबमर्सीबल इलेक्ट्रीक मोटार, केबल वायर १००/रु फुट व नॉयलान रस्सा असा एकुण १२,४००/रु माल कोणीतरी अज्ञात चोराने कणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी नरेन्द्र केशवराव मेश्राम वय ४६ वर्ष, रा. ह.मु. टेकेपार पुर्नवसन यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. खैरे पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

**७) संगनमत करून रापटरने डोक्यावर मारून गभिंर जखमी केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०८/१०/२०१७ चे १०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व त्याची पत्नी आरोपीचे दुकानात जावुन वाढई काम करणारा मजुर सुनिल यास म्हटले की 'तु आमचे दुकानातील काम मधातच का सोडले' असे विचारना केली असता, यातील आरोपी क्र. १ ते ३ यांनी संगनमत करून फिर्यादी सोबत भांडण करून मारण्यास सुरूवात केली तेव्हा भांडण सोडविण्यास फिर्यादीचा लहान मुलगा योगेश वय ४२ वर्ष हा. आला असता, आरोपी क्र. १ ने रापटरने डोक्यावर मारून गभिंर जखमी केली व आरोपी क्र. ४ ने काठीने हातावर मारून जखमी केल्याने फिर्यादी लक्ष्मण पंढरी भादक्कर वय ७५ वर्ष रा. शुक्रवारी वार्ड पवनी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**८) अवैध दारू अडयावर धाडी . :–**

दिनांक ०८/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, कारधा, लाखांदुर येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून ३५ लिटर हातभट्टी दारु+ १०० किलो सडवा मोहा +साहीत्य किंमती ९,७५०/–रु, व १८ लिटर ९०० मिलीलीटर देशी दारू कि. ६,३००/रु असा एकुण १६०५०/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

09.10

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता